# पोलिस भरती : ६ जूनपासून मैदानी, 30 ऑगस्टपूर्वी लेखी परीक्षा होणार

## ऑक्टोबर अखेर उमेदवारांचे प्रशिक्षण सुरू होणार

**प्रतिनिधी | सोलापूर**

लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर पोलिस भरतीची मैदानी चाचणी घेण्याचे नियोजन गृहविभागाने केले आहे. जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांना मैदाने प्रमाणीकरणाचे पत्र राज्य शासनाकडून पाठवण्यात आले आहे. राज्य राखीव पोलिस बल या घटकातील पोलिस शिपाई भरती प्रक्रिया सन २०२२-२३ ही येत्या ६ जून २०२४ रोजी सुरु होत आहे.

पोलिस भरतीच्या मैदानी चाचणीनंतर राज्यातील सर्वच जिल्ह्यांत लेखी परीक्षा एकाच वेळी होणार आहे. जवळपास ३० ऑगस्टपूर्वी पोलिस भरतीची प्रक्रिया संपवण्याचे गृहविभागाचे नियोजन आहे. ऑक्टोबर महिनाअखेर पोलिस भरतीत निवड झालेल्या उमेदवारांचे प्रशिक्षण सुरू होणार आहे.

दरम्यान, सशस्त्र पोलिस भरती प्रक्रियेमधील उमेदवारांच्या मैदानी चाचणीसाठी ५ किमी धावणे, १०० मीटर धावणे व गोळाफेक यासाठी शहरात चार मैदाने तयार करण्यात आली आहेत. ही मैदाने प्रमाणित करणे आवश्यक असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.